महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५,६००-३९,१०० + ग्रेड पे रुपये ५,४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या विनंती बदल्या

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन आदेश, क्रमांकः बदली २०१७/प्र.क्र.३५५ /सेवा-३

१० वा मजला, संकुल इमारत, गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१८

शासन आदेश-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन रुपये ५,४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे ऑनलाईन संगणकीय प्रणालीमार्फत विनंती अर्ज व लोकप्रतिनिधींच्या शिफारशी या अनुषंगाने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंत्या, त्यांची शैक्षणिक अर्हता, मा.लोकप्रतिनिधींच्या शिफारशी, रुग्णसेवा इत्यादी बाबी विचारात घेऊन विहीत केलेले निकष व अनुषंगीक लोकहित तसेच प्रशासनाची निकड याबाबींचा विचार करुन महाराष्ट्र कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील कल ४ (४) च्या तरतुदीनूसार खालील विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या प्रमाणे त्यांच्या विनंती बदल्या करण्यात येत आहेत.

अ.क्र.	वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव	सध्या कार्यरत ठिकाण	बदलीचे ठिकाण
१.	२.	३.	४.
१	डॉ. संदिप पेंढारकर	प्रा आ केंद्र मोऱ्हांडा जि पालघर	प्रा आ केंद्र लामजणा ता. औसा जि लातूर

१) बदली करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांच्या बदली झालेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरीता पर्यवेक्षकीय अधिका-यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे आणि संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होऊन, त्याबाबतचा रुजू अहवाल संबंधित उप संचालक, आरोग्य सेवा (परिमंडळ); संचालक, आरोग्य सेवा, मुंबई आणि शासनास सादर करावा.

२) सदर बदली आदेशामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याकरीता दिर्घकाळ गैरहजर असलेल्या तसेच राजीनामा दिलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागेवर वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली दर्शविलेली आहे. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांना तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घ्यावे व राजीनामा दिलेल्या किंवा दिर्घकाळ अनधिकृत गैरहजर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांबाबत आवश्यक तो प्रस्ताव रितसर पध्दतीने संचालक, आरोग्य सेवा यांच्यामार्फत विहीत पध्दतीने सादर करावा.

३) बदली झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी, त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर अनुज्ञेय पदग्रहण अवधीत नविन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. जे वैद्यकीय अधिकारी या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा अधिकाऱ्यांची अनुपस्थिती **"अनधिकृत गैरहजरी"** म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही याची जाणीव सर्व संबंधीतांना करुन देण्यात येत आहे.

४) आरोग्य सेवा संचालनालयाने जे वैद्यकीय अधिकारी त्यांचे पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत त्यांचे विरुध्द वेळीच कारवाई सुरु करावी. जेणेकरुन वैद्यकीय अधिकारी वेळीच नविन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होतील. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत संबंधीत अधिका-यांना कार्यमुक्त करण्याची जबाबदारी पर्यवेक्षकीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा (परिमंडळ) यांची राहील.

५) दिर्घकाळ अनधिकृतपणे गैरहजर असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागी ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदास्थापना देण्यात आली आहे, त्यांना रुजू करुन घ्यावे व दिर्घकाळ अनधिकृत असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल), १९७९ अंर्तगत कार्यवाही तात्काळ सुरु करावी. अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांचेबाबतीत त्यांचे प्रकरणपरत्वे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

६) या बाबी विचारात घेऊन या प्रकरणी वेळोवेळी शासनास अवगत करावे व संबंधित परिमंडळाचे उप संचालक, आरोग्य सेवा यांनी रिक्त पदाच्या अद्ययावत तपशीलासह अनुपालन अहवाल संचालक आरोग्य सेवा यांच्या मार्फत शासनास सादर करावा.

(७) सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१६१२४८२०१३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Hanmantrao Bhosale

Digitally signed by Satish Hanmantrao Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c0ff0607bc973d9663171bd9b8a9b9ab8cb569b155f9653d1180a4549819299, cn=Satish Hanmantrao Bhosale
Date: 2018.02.16 16:23:03 +05'30'

(स. ह. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित वैद्यकीय अधिकारी गट-अ (यांना संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांच्या मार्फत)

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र १ /२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.
२) संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
३) उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे / लातूर.
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर / लातूर.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर / लातूर.
६) निवडनस्ती (सेवा-३)